आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.३५ वाजता

३० ऑगस्ट २०२६ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- अमली पदार्थमुक्त युवा ही मोहीम म्हणजे देशाच्या युवा वर्गाच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा सामूहिक संकल्प असल्याचं, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं ‘मन की बात’ मध्ये प्रतिपादन

- भारत आणि उझबेकिस्तान यांच्यातले संबंध 'सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारी' च्या पातळीवर न्यायला दोन्ही देशांच्या नेत्यांची संमती

- प्रश्न विचारणाऱ्या विद्यार्थ्यांना दंडात्मक कारवाईचा धाक दाखवणं हे घटनाबाह्य असल्याचं सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती न्यायाधीश उज्जल भुयान यांचं प्रतिपादन

- नेपाळमध्ये आलेल्या महापुरात मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या ७८१वर, २७५ भारतीयांसह अडीच हजारापेक्षा जास्त जण अद्याप बेपत्ता

आणि

- महिलांच्या आशिया चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत थायलंडविरुद्धच्या सामन्यात भारताची चांगली सुरुवात

**<><><><><>**

देशभरात राबवली जात असलेली अमली पदार्थमुक्त युवा ही मोहीम युवा वर्गाच्या भविष्यासाठीचा सामूहिक संकल्प असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. त्यांनी आज आकाशवाणीवर 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासीयांशी संवाद साधला. अमली पदार्थांविरोधात जनजागृती करणाऱ्यांचं आणि या व्यसनाशी झुंज देणाऱ्यांना मदत करणाऱ्यांचं त्यांनी कौतुक केलं. ही मोहीम प्रभावी ठरावी यासाठी देशातल्या आशय निर्मात्यांनी योगदान द्यावं असं आवाहनही त्यांनी केलं.

जेव्हा एखाद्या स्त्रीनं सुरु केलेला व्यवसाय वाढतो, तेव्हा तिच्या संपूर्ण कुटुंबाचं भविष्य उज्ज्वल होतं, घरातल्या गरजा पूर्ण झाल्यानं या महिलांचा आत्मविश्वास वाढतो, असं प्रधानमंत्री म्हणाले. भांडवलाच्या अभावामुळे देशातल्या महिलांच्या व्यवसायाची प्रगती होत नव्हती, मात्र आता प्रधानमंत्री स्वनिधी योजनेमुळे देशभरातल्या सुमारे ३५ लाख महिला

आपल्या व्यवसायाचा विस्तार करू लागल्या आहेत अशी माहिती त्यांनी दिली. हे महिला सक्षमीकरणाचं एक जिवंत उदाहरण असल्याचं ते म्हणाले.

आज आपल्या मुलींची स्वप्न अवकाशात झेप घेऊ लागल्याचं ते म्हणाले. याच अनुषंगानं भारत मिशन शक्तीसॅट अभियान राबवत आहे, या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात विद्यार्थिनींच्या सहभागानं तयार केलेला एक उपग्रह चंद्राच्या कक्षेत पाठवण्याची तयारी सुरू आहे अशी माहिती त्यांनी दिली.

स्वच्छतेचं महत्त्वही त्यांनी अधोरेखीत केलं. जेव्हा लोक एखादं ठिकाण स्वच्छ ठेवण्याचा संकल्प करतात, तेव्हा त्या जागेची संपूर्ण ओळखही बदलते, असं ते म्हणाले.

***होल्ड बाईट - MKB SWACHATA***

निसर्गाचं रक्षण केल्यामुळेच आपलं जगणं समृद्ध होऊ शकतं असा विचार मोदी यांनी श्रोत्यांसमोर मांडला. वनसंवर्धन आणि उपजीविकेचा समतोल साधणारी, तसंच कृषी क्षेत्रातील यशस्वी प्रयोगांविषयी देखील त्यांनी सांगितलं.

आगामी सण-उत्सवांच्या काळात स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी 'व्होकल फॉर लोकल' या मंत्राचा अंगिकार करण्याचं आवाहन त्यांनी केलं. भारतीय वस्तू अभिमानानं स्वीकारल्यानं आत्मनिर्भर भारताचा मार्ग अधिक प्रशस्त होत जाईल, असं ते म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज आकाशवाणीवरील मन की बात या कार्यक्रमात मुंबईतल्या कृष्ण शेषाद्री यांच्याशी संवाद साधला. ऐतिहासिक माहिती रंजक पद्धतीनं मांडता यावी, यासाठी कृष्ण शेषाद्री यांनी भारत राज्य हे संकेतस्थळ सुरु केलं आहे. प्रधानमंत्र्यांनी या संवादात शेषाद्री यांच्या या अभिनव प्रयत्नाबद्दल समजून घेतलं. प्रधानमंत्र्यांनी केलेल्या या उल्लेखाबद्दल आनंद वाटत असल्याची भावना कृष्ण शेषाद्री यांनी आकाशवाणीशी बोलताना व्यक्त केली.

***होल्ड बाईट - कृष्ण शेषाद्री***

**<><><><><>**

भारत आणि उझबेकिस्ताननं परस्पर द्विपक्षीय संबंध सर्वसमावेशक धोरणात्मक भागीदारीच्या पातळीवर नेण्याचा निर्णय घेतला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि उझबेकिस्तानचे अध्यक्ष शौकत मिर्झियो-एव्ह यांच्यात आज ताश्कंदमध्ये झालेल्या शिष्टमंडळ

स्तरीय चर्चेत हा निर्णय झाला. २०३० पर्यंत ५ अब्ज अमेरिकी डॉलर इतक्या वार्षिक व्यापाराचं उद्दिष्टही या बैठकीत निश्चित केलं गेलं. उझबेकिस्तानाकडून भारताला युरेनियमचा दीर्घकालीन पुरवठा करण्यासाठी एक आराखडा तयार करण्यावर दोन्ही देशांनी सहमती दर्शवली. यावेळी विविध क्षेत्रांशी संबंधित करारांवर स्वाक्षरी झाली तसंच विविध क्षेत्रांमधलं सहकार्य अधिक दृढ करण्यावर सहमतीही व्यक्त केली गेली. 'विकसित भारत' आणि 'यांगी उझबेकिस्तान' या सामायिक विकासाच्या संकल्पांना पुढची दिशा देण्याच्या उपाययोजनांवर या चर्चेत भर दिला गेला.

दोन्ही देशांमधल्या सहकार्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल प्रधानमंत्री मोदी यांना 'ओली दर्जाली दोस्तलिक' या उझबेकिस्तानच्या परदेशी नेत्यांसाठीच्या सर्वोच्च पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं.

प्रधानमंत्र्यांनी मिर्झियो-एव्ह यांच्यासोबत अध्यक्षांच्या निवासस्थानी वृक्षारोपणही केलं. प्रधानमंत्र्यांनी माजी प्रधानमंत्री लाल बहादूर शास्त्री यांच्या ताश्कंद इथल्या स्मारकालाही भेट दिली आणि शास्त्री यांना आदरांजली वाहिली.

दरम्यान आपला उझबेकिस्ताचा दौरा आटोपून प्रधानमंत्री ताश्कंदहून किर्गिझस्तानला रवाना झाले आहेत. तिथे ते ३१ ऑगस्ट आणि १ सप्टेंबर दरम्यान होणाऱ्या 'शांघाय सहकार्य संघटने'च्या २६व्या शिखर परिषदेत सहभागी होणार आहेत.

<><><><><>

वेगळं मत मांडणाऱ्या किंवा प्रश्न विचारणाऱ्या विद्यार्थ्यांना दंडात्मक कारवाईचा धाक दाखवणं हे घटनाबाह्य आणि अधिकाराचा गैरवापर करणारं आहे, असं मत सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती न्यायाधीश उज्जल भुयान यांनी आज मांडलं. दिल्लीच्या राष्ट्रीय विधी महाविद्यालयाच्या १३व्या दीक्षांत समारंभात ते बोलत होते. विद्यापीठांमध्ये प्रस्थापित पदांची चिकित्सा व्हायला हवी, त्यांच्यावर प्रश्न उपस्थित व्हायला हवेत आणि मतभेदांची परिणती वैमनस्यात होता कामा नये, असंही ते म्हणाले.

<><><><><>

देशाची सॉफ्ट पावर, जागतिक पातळीवरचं स्थान आणि द्विपक्षीय संबंधांना चालना देण्यात विविध देशांमध्ये राहणाऱ्या भारतीय समुदायाची भूमिका प्रशंसनीय आहे, असं प्रतिपादन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी आज केलं. अमेरिका दौऱ्यादरम्यान शिकागो इथल्या

भारतीय समुदायाला त्या संबोधित करत होत्या. फक्त एक मोठी बाजारपेठ म्हणून नव्हे, तर स्वायत्त संरक्षण व्यवस्था विकसित करणं, त्यांची चाचणी घेणं आणि त्यांचं उत्पादन करणं, त्यांच्या तांत्रिक क्षमतांचा फायदा करून घेणं, कुशल मनुष्यबळ आणि वाढत्या नवोन्मेष व्यवस्थेचा ग्लोबल हब म्हणून भारत उभा राहात आहे, असंही त्या म्हणाल्या. शिकागोतल्या निवडक कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि प्रतिनिधींशी त्यांनी बैठकाही घेतल्या.

<><><><>

महिलांच्या आशिया चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत थायलंडविरुद्धच्या सामन्यात भारताच्या फलंदाजांनी चांगली सुरुवात केली. थायलंडनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा थायलंडच्या १० षटकांत २ बाद १०१ धावा झाल्या होत्या.

शफाली वर्मानं अर्धशतकी खेळी केली आणि ती खेळपट्टीवर टिकून आहे.

<><><><>

नेपाळमध्ये आलेल्या महापुरात मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या ७८१ झाली आहे, तर अडीच हजारापेक्षा जास्त जण अद्याप बेपत्ता आहेत. यात २७५ भारतीय नागरिकांचा समावेश आहे. सुमारे साडे ९ हजार नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे. या दुर्घटनेचा फटका बसलेल्या ८ जिल्ह्यांमध्ये मदत आणि बचावकार्य सुरू असून अजूनही मृतदेह बाहेर काढले जात आहेत. 'भोटेकोशी' नदीला पूर येण्याची शक्यता लक्षात घेता, नेपाळ सरकारने ३ जिल्ह्यांमधल्या नदीलगतच्या भागातल्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा जारी केला आहे. नेपाळमधल्या बचाव आणि मदत कार्यासाठी भारतातून ११ टन मदतसामग्री घेऊन चौथं विमान काठमांडूमध्ये दाखल झालं असून, ही मदतसामग्री नेपाळ सरकारकडे सुपूर्द करण्यात आल्याची माहिती परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी दिली आहे. दरम्यान, नेपाळमधल्या महापुरामुळे काठमांडू इथं अडकलेले नागपूरचे १०२ यात्रेकरू आज सकाळी सुरक्षितपणे राज्यात परतले.

<><><><>

भारताचा स्क्वॉशपटू अभय सिंह यानं मलेशियात झालेल्या पीएसए चॅलेंजर स्पर्धेचं जेतेपद पटकावलं आहे. अंतिम लढतीत त्यानं हाँगकाँगच्या हेन्री लेउंग याच्यावर पाच गेम्समध्ये ११-७, ६-११, ३-११, ११-५, १२-१० अशी मात केली.

**<><><><><>**

नासाने आज फ्लोरिडा इथून नॅन्सी ग्रेस रोमन या अंतराळ दुर्बिणीचं फाल्कन रॉकेटवरून प्रक्षेपण केलं. आता ही दुर्बीण ३ महिन्यांपेक्षा जास्त प्रवास करून १६ लाख किलोमीटरवरच्या एका निरीक्षण बिंदूवर पोहोचेल. नासाच्या पहिल्या मुख्य खगोलशास्त्रज्ञ नॅन्सी ग्रेस रोमन यांच्या नावावरून या दुर्बिणीचं नाव ठेवण्यात आलं आहे.

**//<><><><><>//**